


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक १४३, गुरुवार १५ फेब्रुवारी २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# खा. विखे यांनी जिल्ह्याचा भरभरुन विकास केला - धनश्री विखे

## नगरसेवक युवराज पठारे यांच्या निवासस्थानी हळदी कुंकू

पारनेर : प्रतिनिधी

**ना. राधाकृष्ण विखे यांना महसूल मंत्रीपदासारखे मोठे पद मिळाले यामागे तुम्हा सर्वांचा आशिर्वाद आणि विश्वास असल्याचे नमुद करतानाच ना. विखे यांच्या मार्गदर्शनाखाली खा. डॉ. सुजय विखे यांनी नगर जिल्हयाचा भरभरून विकास केला असल्याचे धनश्री सुजय विखे यांनी सांगितले.**

नगरसेवक युवराज पठारे यांच्या निवासस्थानी आयोजित हळदीकुंकू कार्यक्रमात विखे या बोलत होत्या. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर महिला उपस्थित होत्या.

धनश्री विखे म्हणाल्या, नगर जिल्हयात विखे कुटूंबाचे आज जे नाव आहे त्याचे सर्व श्रेय पद्मभुषण स्व. बाळासाहेब विखे यांना आहे. स्व. विखे यांच्यासोबत काम करणारे कार्यकर्ते आजही त्यांचे नातू डॉ. सुजय विखे यांच्यासोबत आहेत याचा आम्हाला अभिमान आहे. मागील निवडणूकीत सर्वात जास्त साथ याच लोकांनी आम्हाला दिलेली आहे. हे लोक पिढयान् पिढयांपासून आमच्या कुटूंबावर विश्वास ठेवला याबद्दल मी त्यांना धन्यवाद देत असल्याचे विखे यांनी सांगितले.

विखे पुढे म्हणाल्या, डॉ. सुजय विखे हे न्यूरो सर्जन आहेत. १३ वर्षे त्यांनी वैद्यकीय क्षेत्राचा अभ्यास केला. ते पुर्वीपासून होस्टेलमध्ये होते. त्याचे कारण सासुबाई शालीनीताई विखे यांची इच्छा होती की त्यांनी राजकारणात दिसू नये. त्यामुळे पहिलीपासून



■ नगरसेवक युवराज पठारे यांच्या निवासस्थानी धनश्री विखे यांच्या उपस्थितीत हळदी कुंकू कार्यक्रम पार पडला.

### पठारेंकडून बोलण्याचे धडे घेतले पाहिजेत !

सर्व रणरागिणी फेटा बांधून हळदी कुंकू कार्यक्रमास उपस्थित आहेत. पठारे कुटूंबातील रणरागिणींनीही व्यासपीठावरून आपली भुमीका मांडली. अतिशय सुंदर पध्दतीने त्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले.आपणही त्यांच्याकडून व्यासपीठावरून कसे बोलले पाहिजे हे शिकले पाहिजे असे सांगत विखे यांनी मनिषा पठारे यांच्या भाषणाचे कौतुक केले.

### डॉ. विखे जिल्हाला परिवार समजतात

आपण मतदार संघात डाळ व साखरेचे वितरण केले. खरे तर प्रत्येक खासदार हे करू शकत होता. कारण प्रत्येक खासदाराची ही जबाबदारी आहे की रामलल्लाच्या स्वागतासाठी नागरीकांसाठी अशा प्रकारचे उपक्रम राबवायला हवेत. तुमचे एकमेव खासदार असे आहेत की ते संपूर्ण नगर जिल्हयाला आपला परिवार समजतात. मीच नाही तर नगर जिल्हयातील प्रत्येकाने रामलल्लाचे स्वागत केले पाहिजे अशी त्यांची भूमिका असल्याचे विखे यांनी नमुद केले.

### आयुष्य सुंदर, त्याचे सोने करा !

जीवन जगताना अनेक वेदना, संघर्ष वाटयाला येतात. मात्र खचून न जाता ताठ मानेने जगा, आयुष्य सुंदर आहे, त्याचे सोने करायला शिका. आयुष्यात माझं म्हणून नाही तर आपलं म्हणून जगता आले पाहिजे. ज्याला दु:खाची जाणीव असते त्याला सुखाची किंमत असते. आयुष्यात सुंदर चेहरा म्हातारा होतो. बलाढय शरीर गळून जाते परंतू पैसा, संपत्ती सगळे संपते मात्र एक चांगल्या व्यक्तीचा विचार चांगलाच राहतो.

मनिषा युवराज पठारे

### डॉ. विखे यांचे पंतप्रधानांकडून कौतुक

वयोश्री योजनेतून डॉ. विखे यांनी मोफत वस्तूंचे वितरण केले. त्याची दखल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही घेतली. कारण प्रत्येक जिल्हयाला १ ते १० कोटींचे बजेट होते. खा. डॉ. विखे यांनी ४० कोटींचे बजेट नगर जिल्हयासाठी आणले. व वयोवृध्दांना लाभ मिळवून दिल्याचे विखे यांनी सांगितले.

### विधवांना सन्मानाचे स्थान हवे

दरवर्षी आपण हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करतो. अशा कार्यक्रमांमध्ये विधवा माता भगिनींनाही आमंत्रीत केले पाहिजे. पतीच्या निधनानंतर ज्या महिलेस विधवा म्हणून संबोधले जाते. तीने कुटूंबासाठी काबाडकष्ट केलेले असतात. या महिलेला समाजामध्ये सुवासिन म्हणून प्रत्येक ठिकाणी स्थान दिले पाहिजे.

मनिषा युवराज पठारे

### अन्यायविरोधात लढा उभारायला हवा

मोबाईलमुळे लहान मुले, तरूण पिढी भरकटत चालली आहे. बलात्कार, अत्याचाराच्या घटना घडत असतात. अशा वेळी पिडीतेच्या मदतीला धावून जाणे हे आपले कर्तव्य आहे. घटना घडली ती आपल्याच घरातील आहे हे समजून महिलांनी संघटीत झाले पाहिजे, स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली पाहिजे. अन्यायाविरोधात लढा उभारला पाहिजे असे मनिषा पठारे म्हणाल्या.

# मनोज जरांगे यांना पाठिंब्यासाठी पारनेर, निघोजसह विविध गावात बंद

## मराठा आरक्षणासाठी सरकार चालढकल करीत असल्याचा आरोप

पारनेर : प्रतिनिधी



**मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या आंतरवाली सराटी (जालना) येथे सुरू असलेल्या बेमुदत उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी पारनेर,निघोजसह तालुक्यातील विविध गावांमध्ये बंद पाळण्यात आला.पारनेर येथे बंदला संमिश्र प्रतिसाद मिळाला.तर निघोज येथील व्यावसायिकांनी उस्फूर्तपणे कडकडीत बंद पाळला.वडझिरे येथील व्यापारीही बंदमध्ये सहभागी झाले होते.**

**केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी मनोज जरांगे यांच्या विषयी केलेल्या बदनामीकारक वक्तव्याचा निषेध करण्यात आला. जरांगे यांच्या उपोषणाची एक नाटक म्हणून संभावना करणाऱ्या राणेंना मराठा समाज त्यांची जागा दाखवून देईल असा इशारा सकल मराठा समाजाच्या वतीने एका पत्रकाद्वारे देण्यात आला.राणेंच्या बोलवित्या धन्याने त्यांना आवरावे असे आवाहन करण्यात आले आहे.**

मराठा समाजाला सरसकट इतर मागासवर्ग प्रवर्गातून कुणबी जात प्रमाणपत्र मिळावे,२६ जानेवारी रोजी काढण्यात आलेल्या अध्यादेशाच्या मसुद्याततील सगेसोयरे शब्दाची व्याख्या स्पष्ट करावी, मराठा आंदोलनादरम्यान दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घ्यावेत या मागण्यांसाठी मनोज जरांगे यांनी १० फेब्रुवारीपासून बेमुदत उपोषण सुरू केले आहे.या उपोषणाच्या चौथ्या दिवसांपर्यंत सरकारने गांभीर्याने दखल घेतली नाही.मराठा आरक्षणासाठी विधीमंडळाचे विशेष अधिवेशन बोलावण्यात सरकारकडून टाळाटाळ होत असल्याने जरांगे यांना पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली होती.या हाकेला प्रतिसाद देत आज, बुधवारी पारनेरसह तालुका बंदचे आवाहन करण्यात आले होते.या आवाहनाला तालुक्यातील विविध गावांमधून चांगला प्रतिसाद मिळाला.कोणताही अनुचित प्रकार न घडता तालुक्यातील विविध गावांमध्ये बंद शांततेत पार पडला.

पारनेर शहरातील मुख्य बाजारपेठ,नवीपेठ येथील व्यावसायिकांनी आपले व्यवहार बंद ठेवून जरांगे यांच्या उपोषणाला पाठिंबा दिला.काही सहकारी संस्था बंदमध्ये सहभागी झाल्या होत्या.
मात्र बसस्थानक परिसरातील काही छोटे व्यवसाय सुरू होते.शाळा, महाविद्यालय नेहमीप्रमाणे सुरू होते.सध्या परिक्षांचे दिवस असल्याने शाळा, महाविद्यालयांमध्ये बंदचे आवाहन करण्यात आले नव्हते असे सकल मराठा समाजाच्या वतीने सांगण्यात आले.

उपोषणाच्या पाचव्या दिवशी मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती चिंताजनकरित्या खालावलेली असतानाही सरकारकडून कोणतीही हालचाल होत नसल्याने सरकारच्या हेतूविषयी शंका उपस्थित होत आहेत. सरकार मराठा आरक्षणावर निर्णय घेण्यात चालढकल करीत आहे, वेळकाढूपणा करीत असल्याचा आरोप सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आला.



## शॉर्ट न्यूज

### एक लाख रुपये रक्कम लांबविली

■ **संगमनेर :** मार्गेच्या पुणे - नाशिक महामार्गाच्या बाजूला घेऊन पाहणी करत असताना दोघा भामट्यांनी मदतीचा बहाणा करून बॅगेतील एक लाख रुपयांची रक्कम घेऊन पोबारा केला. बोटा गावाअंतर्गत असलेल्या माळवाडी येथे घडली. राहुल सुदाम गाडेकर पहाटेच्या वेळी चारचाकी वाहनातून पुणे-नाशिक महामार्गावरून माळवाडी येथून जात असताना वाहनातून काहीतरी आवाज आला, असता ते थांबले. त्याचा फायदा उचलून दोघा भामट्यांनी वाहनात ठेवलेल्या बॅगेतील एक लाख रुपयांची रक्कम चोरून पोबारा केला. याप्रकरणी राहुल गाडेकर यांनी घारगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

### शेवगावातील कापूस उत्पादक शेतकरी संकटात

■ **शेवगाव :** तालुक्यात जवळपास ८९ टक्के शेतकऱ्यांनी कापसाची लागवड केली होती; परंतु कमी पाऊस झाल्यामुळे अत्यंत कमी प्रमाणात कापसाचे उत्पादन झाले. किमान प्रतिक्टिल दहा हजार रुपये दर शेतक-यांच्या पदरात मिळेल, अशी आशा शेतकऱ्यांना होती; परंतु ५ ते ६ हजार रुपये दर मिळत असल्याने शेतकऱ्यांच्या पदरी निराशा येत असल्याने तालुक्यातील शेतकरी संकटात सापडला आहे. शेतकरी चिंतातुर झाले. शासनाने तातडीने सीसीआय खरेदी केंद्र सुरू करावे, अशी मागणी स्वाभिमानीचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय फुंदे यांनी लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

### नेवाशात गुरुवारी आम आदमी पक्षाची सभा

■ **नेवासा :** आम आदमी पार्टीच्यावतीने उद्या गुरुवार १५ फेब्रुवारी रोजी शहरातील नगरपंचायत चौकात जाहीर सभा आयोजित करण्यात आली असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष राजू आघाव व निवडणूक प्रमुख ॲड. सादिक शिलेदार यांनी दिली. नेवासा तालुक्यातील भूमिपुत्र अजित फाटके यांची प्रथमच पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल पक्षाच्यावतीने सायंकाळी पाच वाजता सत्कार करण्यात येणार आहे. सत्कार व जाहीर सभेस उपस्थित राहण्याचे आवाहन शहराध्यक्ष संदीप आलवणे, सलीम सय्यद, देवराम सरोदे यांनी केले आहे.

### एमआयडीसीची घोषणा म्हणजे चुनावी जुमला

■ **श्रीगोंदा :** खा. डॉ. सुजय विखे पाटील हे खासदारकीच्या गेल्या चार साडेचार वर्षाच्या कालखंडात त्यांना श्रीगोंदा तालुक्यातील एमआयडीसी व श्रीगोंदा-नगर तालुक्याला वरदान ठरणाऱ्या साकळाई योजनेची आठवण झालेली नाही.मात्र लोकसभेच्या निवडणुका डोळयासमोर आल्यानंतर साकळाई उपसा सिंचन योजनेचे सर्वे क्षण व एमआयडीसीला तत्वतः मंजुरी अशा फसव्या घोषणा हा विखे पिता-पुत्राचा चुनावी जुमला आहे. निव्वळ जनतेच्या डोळ्यात धुळफेक चालू आहे असा घणाघाती आरोप घनःशाम शेलार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केला आहे.

### मीराताई शिंदे यांची नियुक्ती

■ **नगर :** शिवसेनेच्या नगर तालुका प्रमुखपदी अजित विठ्ठल दळवी तर महिला आघाडी जिल्हाध्यक्षपदी मीराताई शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली. आयटीआय महाविद्यालय जवळील शिवसेनेच्या मध्यवर्ती जिल्हा कार्यालयात जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, संपर्क प्रमुख सचिन जाधव व शहर प्रमुख दिलीप सातपुते यांच्या हस्ते दळवी व शिंदे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी युवा सेनेचे शहर जिल्हाध्यक्ष महेश लोंढे, अल्पसंख्यांक आघाडीचे सर्फराज खान, माने सर, नंदकुमार ताडे, वैद्यकीय मदत कक्ष आदींसह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिरुरकरांना नामवंत व्याख्यात्यांच्या व्याख्यानांची मेजवानी!

■ शिरुरला स्व. धनराज नहार स्मृती व्याख्यानमाला
■ श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीचा उपक्रम



**शिरुर : प्रतिनिधी**

**श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीच्यावतीने शिरुर येथे स्व. धनराज नहार स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील साई गार्डन मंगल कार्यालयात गुरुवार ( दि.१५ ) पासून पाच दिवस दररोज सायंकाळी ६ :४५ वाजता ही व्याख्याने होणार आहेत, अशी माहीती व्याख्यानमालेचे संयोजक रविंद्र धनक यांनी दिली.**

दि. १५ रोजी मुंबईचे प्रसिद्ध लेखक अच्युत गोडबोले एक-वन आर्टिफिशियल आणि उद्याचे जग या विषयावर पहिले पुष्प गुंफणार आहेत. दि. १६ रोजी प्रसिद्ध पत्रकार व लेखक चंद्रकांत झटाले अकोला हे मजबुती का नाम महात्मा गांधी या विषयावर आपले मत मांडणार आहेत.

दि. १७ रोजी हभप धर्मकीर्ती महाराज परभणीकर शिवकाळ आणि आजची परिस्थिती या विषयावर बोलणार आहेत. दि. १८ रोजी प्रसिद्ध राजकीय विश्लेषक आणि संशोधक डॉ. प्रकाश पवार शिवाजी महाराज आणि सामाजिक सलोख्याची राजकीय नीती या विषयावर बोलणार आहेत. दि. १९ रोजी प्रसिद्ध लेखक डॉ. गिरीष झाकोटिया छत्रपती शिवाजी महाराज आणि २१ वे शतक या विषयावर भाष्य करणार आहेत.

दि. २० रोजी पुणे- नगर रस्त्यावर शिवसेवा मंडळाजवळ शिवरायांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात येणार आहे. व्याख्यानमालेचे यंदाचे २७ वेळ वर्ष आहे. शहरातील जास्तीत जास्त नागरीकांनी या व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री. धनक यांनी केले आहे.

## रमाई घरकूल योजना; नगर जिल्ह्यात २६ हजार घरे पूर्ण

**नगर : प्रतिनिधी**

**आर्थिक दुर्बलतेमुळे स्वतःचे घर बांधू शकत नाही, अशा लोकांसाठी राज्य शासनाने रमाई आवास घरकूल योजना सुरू केली आहे. नगर जिल्ह्यात गेल्या सात वर्षात २६ हजार १५५ घरे पूर्ण झाली आहेत.**



या योजनेची अंमलबजावणी ग्रामीण भागासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, तर शहरी विभागासाठी नगरपरिषद, नगरपालिका, महापालिका या स्थानिक यंत्रणामार्फत करण्यात येते. या योजनेंतर्गत महाराष्ट्रातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नवबौद्ध प्रवर्गातील गरीब लोकांना घरे उपलब्ध करून दिली जातात. रमाई योजनेत घर बांधकामासाठी १ लाख २० हजारांचे अनुदान मिळते. शिवाय स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शौचालयासाठी १२ हजार रुपयांचे अनुदान मिळते. याव्यतिरिक्त रोजगार हमी योजनेतून २१ हजार ४२० रुपयांची मजुरी दिली जाते, अशा प्रकारे दीड लाखांपर्यंत हे अनुदान मिळते. लाभार्थी कुटुंबाचे उत्पन्न एक लाख रुपयांच्या आत असेल, तर त्यांना घरकूल योजनेसाठी अनुदान मिळते.

# महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या दृष्टिकोनातून काम

■ खा. डॉ. सुजय विखे पाटील यांचे प्रतिपादन
■ बचत गटातील महिलांना साहित्य वाटप

**राहुरी : प्रतिनिधी**

**स्वयंरोजगारातून व आर्थिक दृष्टीकोनातून महिलांचे सक्षमीकरण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी महिलांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने काम करत असल्याचे खासदार सुजय विखे पाटील यांनी स्पष्ट केले.**

खासदार विखे म्हणाले, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून जिल्हा नियोजन विभागाच्या वतीने बचत गटातील महिलांना फूड प्रोसेसिंग व स्टॉल वाटप करण्यात आले आणि या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करून त्यांना रोजगार उपलब्ध करून देत आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवले. पालकमंत्र्यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन महिलांच्या सक्षमीकरणासाठी एक चांगला पर्याय उपलब्ध करून दिला आहे.

कनगर (ता.राहुरी) येथील आयोजित कार्यक्रमामध्ये ते बोलत होते. यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजीराव कर्डिले यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या दरम्यान प्राथमिक स्वरूपात महिला बचत गटांना धनादेश, स्टॉल तसेच फूड प्रोसेसिंग साहित्याचे वितरण करण्यात करण्यात आले.

महिला व बालविकास विभाग आणि ग्रामविकास व जलसंधारण विभाग नव तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प तसेच महिला आर्थिक विकास महामंडळ व उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत प्रतिभा लोकसंचित साधन केंद्र व तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष राहुरी अंतर्गत आणि ग्रामीण स्वंयरोजगार




निर्मिती अंतर्गत स्वंयरोजगार विक्रीकेंद्र, फूड प्रोसेसिंग युनिट, औजार बँक, गटातील महिलांना बँक कर्ज वितरण सोहळा खासदार डॉ. सुजयविखे पाटील व जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजी कर्दिले यांच्या हस्ते संपन्न झाला.

दीड दोन वर्षांपूर्वी आलेल्या महायुती सरकारच्या माध्यमातून आपण प्रामाणिक आणि नैतिकतेने तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजितदादा पवार व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वात जिल्ह्यात कामाचा सपाटा सुरू केला आहे. आजपर्यंत जिल्हा नियोजन विभागाच्या माध्यमातून ५०० बचत गटांना स्वयंरोजगारासाठी विविध साहित्यांची उपलब्धता करून देण्यात आली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून महिलांना सक्षम करण्यासाठी अनेक उपक्रम आज जिल्ह्यात राबविण्यात येत आहेत व सदरील उपक्रमांच्या अंतर्गत विविध बचत गटांच्या माध्यमातून प्रत्यक्षात कामे देखील चालू आहेत. यातून अनेक रोजगाराच्या संधी महिलांना उपलब्ध होत आहेत याचे विशेष समाधान वाटते असे मत सुजय विखेंनी यावेळी मांडले.या अगोदर अनेक पालकमंत्री झाले, पण नामदार राधाकृष्ण विखे पाटील हे पहिले असे पालकमंत्री आहेत की ज्यांच्या प्रयत्नांनी डीपीडीसीच्या माध्यमातून पैशाचा वापर महिलांच्या सक्षमीकरणासाठी तसेच त्यांना रोजगार मिळवण्यासाठी करण्यात आला. विशेष बाब म्हणजे सुमारे ५०० गटातील महिलांना दहा लाख रुपयांचे साहित्य वाटप होत आहे. ही वाटचाल अशीच सुरू राहील आणि पुढील पाच वर्षात संधी भेटल्यास महिलांना अनेक रोजगार उपलब्ध करून देण्याची ग्वाही खासदार विखे यांनी दिली.

तसेच महिलांना कांदा ड्रायर उपलब्ध करून देणार व सडका कांदा घरपोच देऊन त्याचे प्रोसिजर करून तोच कांदा आपण परत घेऊ. अशा पद्धतीने प्रत्येक बचत गटातील महिलांना महिना दहा ते बारा हजार रुपये कमाई चालू होईल असे देखील मत त्यांनी मांडले. यासोबतच निळवंडेच्या पाण्यापासून गावांच्या रस्त्यापर्यंत दिलेल्या शब्द देखील आम्ही पूर्ण केला असल्याचे मत डॉ. सुजय विखे पाटील यांनी मांडले.

**वाचकांच्या लेखणीतून**

## राजकीय वार्तापत्रे

राजकीय वार्तापत्रे हा वृत्तपत्रांचा एक भाग आहे. जनतेची राजकीय मते तयार करणे. प्रचलित राजकीय हालचाली आणि त्यांपाठचा अर्थ आणि अनर्थ जनतेच्या लक्षात आणून देणे. अन्वयार्थ लावणे. अशी या राजकीय वार्तापत्रांची धोरणे असतात.



आपल्या मराठी वृत्तपत्रांत राजकीय वार्तापत्रांचा विषय निघाला तर आदर्श म्हणून मी केसरी नियतकालिकातून प्रकाशित होणाऱ्या जयंतराव टिळकांच्या राजकीय वार्तापत्रांचा उल्लेख करीन. अशी ही दिल्ली या नावाचे त्यांचे एक संकलन ४०-४५ वर्षांपूर्वी मी वाचले होते. फार सुंदर वाटली ती वार्तापत्रे!

नागपूर तरुण भारत दैनिकात ज्येष्ठ राजकीय पत्रकार मोरेश्वर बडगे हे सुंदर राजकीय वार्तापत्रे लिहित असतात. त्यांची भाषा सहज, प्रासादिक आणि सामान्य वाचकालाही वाचाविशी वाटावीत अशा दर्जाची असतात. जिधर बम उधर हम, बिन चिपळ्यांचा नारद (शरद पवार), बारामतीची भानामती, तुम्ही लिहून घ्या असे सामान्य जनतेच्या आकलनात येतील असे प्रतिकात्मक शब्द ते वापरतात.

आपल्या अहमदनगरला अजिंक्य भारत नावाचे सुंदर वृत्तपत्र निघत असे. (ते आता बंद पडल्याचे कळते. दु:ख झाले!त्याच्या प्रासंगिक आणि व्यक्तिविशेष सदरात माझेही लेख प्रकाशित होत असत). अजिंक्य भारतमध्ये वृत्तसंपादक असलेले आपल्या टाकळी ढोकेश्वरचे पत्रकार चांद शेख आणि निघोज येथील भागा वरखडे (आता अहमदनगरहून प्रकाशित होणाऱ्या लोकआवाज या दैनिकाचे कार्यकारी संपादक) सुंदर राजकीय वार्तापत्रे लिहित असत. त्यांचा भाषेवरचा काबू आणि विश्लेषणात्मक बुध्दी वाखाणण्याजोगी असे. याबद्दल मी अजिंक्य भारत दैनिकातून आणि फोनद्वारे खाजगीरीत्याही त्यांचे कौतुक केले होते.

हौशी, नवशिक्या वा होतकरू पत्रकारांनी यातून योग्य तो बोध घ्यावा. भाषेवर हुकूमत मिळविणे ही पत्रकारांची पहिली अट मानली पाहिजे. पाश्चात्य आणि पौर्वात्य इंग्रजी आणि हिंदी तथा मराठी अशा राजकीय वार्तापत्रांचा सखोल अभ्यास केला पाहिजे. ग्रामीण भागातही आदर्श राजकीय पत्रकार निपजू शकतात हे आपण सिद्ध करून दाखविले पाहिजे.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

# रात्रीच्या वेळी हत्यारे घेऊन फिरणारे सहा जण ताब्यात

नगरच्या तोफखाना पोलिसांची कारवाई

**नगर : प्रतिनिधी**

**विना नंबरच्या दुचाकीवरून रात्रीच्यावेळी कोयता, लोखंडीगज घेऊन फिरणाऱ्या सहा जणांना तोफखाना पोलिसांच्या गुन्हे शोधपथकाने पकडले. त्यांच्या विरोधात पोलिस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून कोयता, लोखंडी गज, दोन दुचाकी असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

गुन्हे शोध पथकाचे उपनिरीक्षक सचिन रणशेवरे, अंमलदार दत्तात्रय कोतकर, शिरीष तरटे,सतीष भवर, बाळासाहेब भापसेयांचे पथक सोमवारी रात्री हद्दीतगस्त घालत असताना बोल्हेगाव उपनगरातील मोरया पार्क जवळतीन इसम दुचाकीवर फिरत असून त्यांच्याकडे कोयता असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यांनी याठिकाणी जाऊन तिघांना मोपेड दुचाकीसह ताब्यात घेतले.




चेतन संतोष सरोदे (वय १८ रा.गांधीनगर, बोल्हेगाव), सागर राम कोकणे (वय १९) व यश रावसाहेब क्षिरसागर (वय १८ दोघेरा. भिंगारदिवे मळा) अशी त्यांची नावे आहेत. तसेच तपोवन रस्त्यावर अविनाश काळु डुकरे(वय १९), सागर बाळू पवार (वय२२) व रोहित विजय फुलारी (वय२३ तिघे रा. गजराजनगर) या तिघा संशयितांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून विना नंबरची दुचाकी, एक लोखंडी गज जप्त करण्यात आला.

# नारायण राणे यांचा पत्ता कट; शिंदेसेनेकडून मिलिंद देवरा

## भाजपकडून अशोक चव्हाण, मेधा कुलकर्णी, डॉ. गोपछडे यांना राज्यसभेची उमेदवारी

**मुंबई : प्रतिनिधी**

**भारतीय जनता पक्षाच्या वतीने महाराष्ट्रातील राज्यसभेच्या तीन उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली आहे. अपेक्षेप्रमाणे काँग्रेस मधून भाजपमध्ये आलेले अशोक चव्हाण यांना राज्यसभेची उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांच्याबरोबरच पुण्यातील भाजपच्या नेत्या मेधा कुलकर्णी यांची देखील नाराजी दूर करत त्यांना राज्यसभेवर पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला.तसेच नांदेड येथील भाजपचे जुने कार्यकर्ते डॉ. अजित गोपछडे यांना देखील राज्यसभेची उमेदवारी देण्यात आली आहे. मात्र केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचा पत्ता भाजपाने कट केला आहे.**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोक चव्हाण यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला, त्याचवेळी त्यांना राज्यसभेचे उमेदवारी दिली जाण्याची शक्यता वर्तवली जात होती. अपेक्षेप्रमाणे अशोक चव्हाण यांचे नाव राज्यसभेचे उमेदवारीच्या यादीत समोर आले आहे. मराठवाड्यातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील मराठा समाजाचा एक मोठा नेता म्हणून अशोक चव्हाण यांच्याकडे पाहिले जाते. अशोक चव्हाण यांचा प्रदीर्घ अनुभव पाहता त्यांना आगामी मंत्रिमंडळात मोदी सरकारमध्ये मंत्रिपद देण्यात येईल, अशी शक्यता देखील वर्तवण्यात येत आहे.

पुण्यातील भाजपच्या नेत्या मेधा कुलकर्णी यांना आमदारकीचे तिकीट नाकारण्यात आल्यामुळे त्या नाराज होत्या. मेधा कुलकर्णी यांचे तिकीट कापत तत्कालीन भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांना पुण्यातून उमेदवारी देण्यात आली होती. त्यामुळे मेधा कुलकर्णी नाराज असल्याच्या बातम्या वारंवार समोर आल्या आहेत. मात्र, मेधा कुलकर्णी यांचे पुनर्वसन लवकरच होईल असे भाजपच्या वतीने सांगण्यात येत होते. त्यानुसार त्यांना आता राज्यसभेची उमेदवारी देण्यात आली आहे.



नांदेडचे डॉ. अजित गोपछडे हे शहरातील एमडी डॉक्टर असून, त्यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेत काम केले आहे. त्यातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशीही त्यांचा जवळचा संबंध आहे. तसेच, मागच्या भाजपच्या सत्ताकाळात त्यांचे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी देखील चांगले संबंध राहिले आहेत. मात्र पक्षात कार्यकर्ता म्हणून त्यांचे काम फारसे चांगले नसून ते लिंगायत समाजाचे असल्याने सोशल इंजिनिअरिंगच्या बळावर त्यांची लॉटरी लागल्याची चर्चा नांदेड जिल्ह्यात आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या वतीने देखील राज्यसभेसाठी उमेदवाराच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. काँग्रेस पक्षाला सोडचिट्टी देत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेमध्ये दाखल झालेले मिलिंद देवरा यांना राज्यसभेची उमेदवारी देण्यात आली आहे. मिलिंद देवरा हे एकेकाळी मुंबई काँग्रेसचे मोठे नाव होते. प्रदेश काँग्रेसचे तगडे नेते म्हणून त्यांची गणना होत होती.

# राजश्री भिसे यांना महाराष्ट्र उद्योजकता पुरस्कार

## अभिनेत्री वर्षा उसगांवकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर शहरातील सौंदर्या ॲकेडमीच्या संचालिका राजश्री उध्दव भिसे यांना अभिनेत्री वर्षा उसगांवकर यांच्या हस्ते महाराष्ट्र उद्योजकता पुरस्कार छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या शानदार समारंभात प्रदान करण्यात आला.**

पुरस्कार प्रदान करण्यात आल्यानंतर राजश्री भिसे यांनी सांगितले की, आपल्या आवडत्या क्षेत्रात अथक परिश्रम केल्यानंतर यश मिळतेच ते दिर्घकाळ टिकते. हे यश खऱ्या अर्थाने सुखावणारे असते. कुटूंबाची साथ मिळाल्यानंतर यशाला सोन्याची झळाळी मिळते. गेल्या २१ वर्षांया सौंदर्या ॲकॅडमीच्या वाटचालीमध्ये पती, आई ,वडील व मुलांची साथ मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

भिसे पुढे सांगतात, सौंदर्य हे कलेचे क्षेत्र आहे. कामात कोणताही भेदभाव न ठेवता फक्त सौंदर्य उपचारांवर लक्ष केंद्रीत केले. परिणामी अकॅडमीचे काम अधिक व्यापक होत गेले. वेगळा उपक्रम म्हणून पारनेर येथे सौंदर्य स्पर्धा घेतली. नाबार्ड संस्थेमार्फत कोर्सेस राबविण्यात आले. राहता येथे उद्योजकता विकास केंद्रात मुलींसाठी प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले. श्रीगोंदे येथे मेकअप सेमिनार घेतले.



सौंदर्या अकॅडमीच्या संचालिका राजश्री भिसे यांना अभिनेत्री वर्षा उसगांवकर यांच्या हस्ते महाराष्ट्र उद्योजकता पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले.

### अनेकदा गौरव

पुणे येथील बेस्ट अकॅडमी अवार्ड, शिर्डी व नगर येथील ब्राइडल कॉम्पीटिशनमध्ये परिक्षक म्हणून काम करण्याची संधी, पुण्यातील इंटरनॅशनल एक्स्पोमध्ये सन्मान, नाबार्ड संस्थेकडून राजश्री यांचा तीनदा सन्मान करण्यात आला आहे.

### सुपर ब्युटीशियन

राजश्री यांनी त्यांच्या कामात कोठेही तडजोड स्विकारली नाही. ब्युटी टिप्स देताना किंवा मेकअप करताना त्या ग्राहकाचे पुर्ण समाधान होईल यावर भर देतात. त्यामुळेच त्या पारनेर तालुक्यात सुपर ब्युटीशियन म्हणून ओळखल्या जातात. ब्युटीशिन म्हणून काम करताना ४ डिसेंबर २०२२ मध्ये एकाच दिवशी ९ नववधू आणि सहा साईड मेक अप केल्याचा अनुभव जबरदस्त होता असे राजश्री भिसे यांनी सांगितले.

### सामाजिक बांधिलकी

नगरच्या स्नेहालयात अनाथ मुलींसाठी मोफत प्रशिक्षण योजना राबवून राजश्री यांनी सामाजिक बांधिलकी जपली. विविधांगी उपक्रमांमुळे त्यांची वाटचाल प्रगतीकडे झाली. आणि सन २०१३ पासून प्रशस्त इमारतीमध्ये सौंदर्या अकॅडमीचे काम जोमाने सुरू झाले.

# विद्यार्थी रमले खेळांच्या मैदानावर!

## खो-खो, कबड्डी, बास्केटबॉल आणि थ्रो बॉलचा लुटला आनंद

पारनेर : प्रतिनिधी

**मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत पारनेर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स या विद्यालयाचे विद्यार्थी एक दिवस विविध खेळांच्या मैदानावर रमले. विविध खेळांचा मनमुराद आनंद घेत विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षणाबरोच खेळास असलेले महत्व अधोरेखित केले.**

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या अभियानांतर्गत शैक्षणिक गुणवत्ता व व्यक्तिमत्व विकासासाठी विद्यालयात विविध क्रिडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के तसेच प्राचार्य गिताराम म्हस्के यांच्या हस्ते या स्पर्धांचे उदघाटन करण्यात आले.

स्पर्धेच्या उदघाटनानंतर थ्रो बॉल, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, खो-खो, धावणे, गोळाफेक, दोरीवरच्या उडया, कबड्डी यांसारख्या देशी व विदेशी खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी उस्फुर्तपणे सहभाग नोंदविला. विविध स्पर्धांमुळे खेळांची मैदाने विद्यार्थ्यांनी फुलून गेली होती. स्पर्धेनंतर विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.



शैक्षणिक गुणवत्ता व व्यक्तिमत्व विकासासाठी पारनेर पब्लिक स्कुल येथे विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

### खेळ जीवनाचा अविभाज्य भाग

खेळ हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग असून जीवनाच्या सर्वच क्षेत्रात खेळाचे खूप महत्व आहे. खेळ माणसाचे चारित्र्य आणि व्यक्तिमत्व घडविण्यास मदत करतात. खिलाडू वृत्ती जोपासत स्वयंशिस्त प्राप्त करण्यासाठी प्रत्येकाने खेळावर आपले लक्ष केंद्रीत केले पाहिजे.

**गिताराम म्हस्के प्राचार्य,**
पारनेर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स

यावेळी बोलताना गिताराम म्हस्के यांनी सांगितले की, खेळ हे आपल्या शारिरिक तंदुरूस्तीसाठी अतिशय महत्वाचे आहेत. खेळ हे वेळेचे बंधन, धैर्य, शिस्त तसेच गटामध्ये काम करण्याची शिकवण देतात. खेळाचा नियमाने सराव केल्यानंतर आपण अधिक सक्रिय आणि निरोगी राहू शकतो. खेळांमुळे आपण विविध संभाव्य आजारापासून सुरक्षित राहू शकतो.

क्रीडा शिक्षक महेश जाधव, दिपक जाधव तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विविध स्पर्धांच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# ढवळपुरीच्या भालेरावांचा देशातील २६ अधिकाऱ्यांमध्ये समावेश !

## माहिती सुरक्षा अधिकाऱ्यांचा गौरव

ढवळपुरी : प्रतिनिधी

**भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून डिजीटल संरक्षणाच्या भविष्याला परीश्रमपुर्वक आकार देणाऱ्या २६ भारतीय मुख्य माहिती सुरक्षा अधिकाऱ्यांचा गौरव करण्यात आले. हे अधिकारी सायबर क्षेत्रातील एक दुरदर्शी अधिकारी म्हणून कार्यरत असून ढवळपुरीच्या खारवाडी येथील राजेंद्र भालेराव यांचाही त्यात समावेश आहे.**

माहीती आणि तंत्रज्ञानाच्या युगात सायबर सुरक्षा हा अविभाज्य भाग असून मुख्य माहिती सुरक्षा अधिकारी यांची भुमीका सायबर हल्ल्यांपासून तसेच डेटाच्या उल्लंघनापासून संरक्षण करण्यासाठी निर्णायक बनली आहे. भारत देश प्रजासत्ताक दिन साजरा करताना देशाच्य डिजिटल पायाभुत सुविधांच्या बळकटीकरण्यासाठी महत्वाची भूमिका बजावणाऱ्या शिर्ष २६ भारतीय अधिकाऱ्यांचा सन्मान हा योग्य क्षण असल्याचे



तसेच राष्ट्रीय सुरक्षेसाठी, तंत्रज्ञानाच्या प्रगतीसाठी डिजिटल सीमांचे रक्षण करण्यात या अधिकाऱ्यांचे कौशल्य महत्वपूर्णआहे. असे हा सन्मान प्रदान करताना सांगण्यात आले.

### सुरक्षा उपायांची खात्री

सन २०२४ च्या अग्रस्थानी असलेल्या अधिकाऱ्यांमध्ये ढवळपुरीच्या खारवाडी येथील राजेंद्र भालेराव यांचाही समावेश आहे. भालेराव हे एका नामांकित बँकेमध्ये मुख्य माहिती सुरक्षा अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. मुंबई विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी मिळविल्यानंतर राजेंद्र यांनी बँकिंग, सल्लागार, दुरसंचार, आयएसपी आणि डेटा सेंटर क्षेत्रात दोन दशकांहून अधिक काळ काम केले आहे. सायबर क्षेत्रातील अनेक प्रमाणपत्रे राजेंद्र भालेराव यांच्याकडे आहेत. त्यांचे कौशल्य बँकेमधील माहिती सुरक्षा उपायांची खात्री देते. ज्यामुळे संस्थेसाठी एक अमुल्य संपत्ती म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. युपीआय, भिम ॲपच्या सुरक्षेमध्ये त्यांचा महत्वाचा सहभाग होता.

# दत्तात्रय दिवटे यांचा उपसरपंचपदाचा राजीनामा

## कार्यकाळास महिना असतानाच दिलेला शब्द पाळला

वाघुंडे बुद्रुक : प्रतिनिधी

**वाघुंडे बुद्रुकचे उपसरपंच दत्तात्रय शिवाजी दिवटे यांनी आपल्या पदाचा राजीनामा कार्यकाळ पुर्ण होण्यास एक महिला शिल्लक असतानाच सरपंच संदीप वाघमारे यांच्याकडे सुपूर्द केला.**

आपली भुमिका स्पष्ट करताना दिवटे यांनी सांगितले की, वाघुंडे ग्रामपंचायतीची सार्वत्रीक निवडणूक झाल्यानंतर सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील ज्येष्ठांनी आपणास उपसरपंचपदाची संधी दिली. सर्वांनी दिलेल्या या संधीबद्दल मी सर्वांचा ऋणी आहे. सर्वांनी माझ्यावर टाकलेला विश्वास तो सार्थ करण्याचा मी प्रामाणिकपणे प्रयत्न केला. उपसरपंच म्हणून काम करताना मी कुठे कमी पडलो असेल किंवा चुकलो असेल तर सर्वजण मला खुल्या दिलाने माफ करतील असा विश्वास व्यक्त करीत मला दिलेले प्रेम तसेच उपसरपंचपदाची संधी यातून भविष्यातही उतराई होण्याचा मी प्रयत्न करेल.



वाघुंडे बुद्रुकचे उपसरपंच दत्तात्रय दिवटे यांनी आपल्या पदाचा राजीनामा सरपंच संदीप वाघमारे यांच्याकडे सुपूर्द केला.

### वयाच्या २६ व्या वर्षी संधी

उपसरपंच म्हणून ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील ज्येष्ठ मंडळींना आपणास वयाच्या २६ व्या वर्षीच उपसरपंचपदाची संधी दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो. लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता तसेच उपसरपंच निवडीची प्रक्रिया पुर्ण व्हावी यासाठी आपण एक महिना आगोदर राजीनामा दिला. भावी उपसरपंच तथा आमचे मार्गदर्शक संतोष गाडीलकर यांना खुप, खुप शुभेच्छा.

**दत्तात्रय शिवाजी दिवटे**
मा. उपसरपंच, वाघुंडे बुद्रुक

दिवटे पुढे म्हणाले, आमदार नीलेश लंके, जिल्हा परिषदेच्या सदस्या राणीताई लंके यांच्या माध्यमातून सरपंच तसेच सदस्यांच्या सहकार्यातून गावामध्ये जिल्हा परिषद तसेच राज्य शासनाच्या विविध योजना राबविण्यासाठी आपण पाठपुरावा केला. गावामधील काही शेतजमीनींवर महाराष्ट्र औद्योगिक वसाहतीचे शिक्के पडल्याने हे शिक्के दुर करण्यासाठी आ. नीलेश लंके यांच्या माध्यमातून मंत्रालय स्तरावर उद्योग मंत्रांकडे पाठपुरावा केला. विविध सामाजिक उपक्रमात योगदान देत सामाजिक बांधिलकी जोपाण्याचाही प्रयत्न केल्याचे दिवटे म्हणाले.

यापुढील काळात ग्रामपंचायतीचा सदस्य म्हणून मी विविध विकास कामे मार्गी लावण्यासाठी सरपंच, उपसरपंच यांच्या बरोबरीने कार्यरत राहणार असून आ. नीलेश लंके यांच्या माध्यमातून विविध विकास कामे गावामध्ये राबविण्यासाठी पुढकार घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# रासेयो स्वयंसेवक पथदिव्यांप्रमाणे पथदर्शी कार्य करतात

## समन्वयक प्रा. गणेश निमसे यांचे प्रतिपादन



अळकुटी : प्रतिनिधी

**राष्ट्रीय सेवा योजना समाजासाठी समर्पित होऊन कार्य करत असते. माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी हा संदेश देत रासेयो स्वयंसेवक सकारात्मक ऊर्जेने प्रवाही होऊन कार्य करत असतात. पथदिवे जसे आपल्या सभोवतालास प्रकाशमान करतात त्याचप्रमाणे रासेयो स्वयंसेवकहि स्वतःच्या सभोवतालास सकारात्मक ऊर्जेने व्यापून टाकतात व पथदिव्यांप्रमाणे पथदर्शी कार्य करत असतात असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा रासेयो विभाग समन्वयक प्रा. गणेश निमसे यांनी केले.**

अळकुटी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर म्हस्केवाडी येथे ८ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी २०२४ या कालावधीकरिता वास्तव्यास आहे. या शिबिराच्या सहाव्या दिवशी रात्री रासेयो अहमदनगर जिल्हा समन्वयक प्रा. गणेश निमसे व त्यांच्या सहकाऱ्यांनी शिबिरस्थळी सदिच्छा भेट दिली व रासेयो स्वयंसेवकांना रासेयोचा इतिहास व उद्देश समजावून सांगत शिबिरार्थीना शुभेच्छा देत त्यांचे मनोबल वाढवले व प्रोत्साहन दिले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद पारखे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. या कार्यक्रमाप्रसंगी प्रा. होळकर, प्रा. विशाल रोकडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. दशरथ पानमंद, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. अर्जुन चाटे, प्रा. सुप्रिया पारखे, प्रा.पोपट सुंबरे, प्रा. मोहन माने, श्री नितीन घोलप व शिबिरार्थी स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अर्जुन चाटे व आभार प्रा. सुप्रिया पारखे यांनी केले.

# बबनराव पुरी (सर) यांचे निधन

टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी

**काकणेवाडी येथील रहिवासी व रयत शिक्षण संस्थेतील ज्येष्ठ सेवानिवृत्त शिक्षक बबनराव पुरी सर यांचे मंगळवारी निधन झाले.ते ७९ वर्षांचे होते.**



रयत शिक्षण संस्थेच्या भाळवणी, कान्हूर पठार, केडगाव , महाळुंगे पडवळ येथे त्यांनी शिक्षक म्हणून काम केले. टाकळी ढोकेश्वर येथील वैद्यकीय व्यावसायिक डॉक्टर विजय पुरी यांचे ते वडील होत त्यांच्या पाठीमागे पत्नी मुलगा सुना,नातवंडे मुलगी असा परिवार आहे.

पारनेर तालुक्यात उत्कृष्ट हॉलीबॉलपटू व पेंटर म्हणून जुन्या काळात त्यांना बी.के.पुरी नावाने ओळखले जात असे. गोसावी समाजाच्या संघटनेमध्ये सक्रिय कार्यकर्ते म्हणून काम करत होते. धार्मिक व आध्यात्मिक क्षेत्रात सेवानिवृत्तीनंतर त्यांनी योगदान दिले.पायी दिंडी सोहळा, व काकणेवाडी येथील विविध सामाजिक,धार्मिक,आध्यात्मिक क्षेत्रात त्यांचा सक्रिय सहभाग असत, काकणेवाडी येथे मंगळवारी सायंकाळी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पारनेर तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# खरीप पिकांसाठी कुकडी कॅनॉल पट्ट्यात पाण्याची गरज

## निघोजच्या शिष्टमंडळाचे आ.नीलेश लंके यांना निवेदन

निघोज : प्रतिनिधी

**कुकडी कॅनॉल पट्यातील वीस पेक्षा जास्त गावांतील खरीप हंगामातील पिके वाचविण्यासाठी दि.२५ फेब्रुवारी पर्यंत कुकडी डावा कालव्याला पाणी येणे आवश्यक असल्याने हे पाणी लवकरात लवकर सोडण्यासाठी आमदार नीलेश लंके यांनी प्रयत्न करावेत या मागणीसाठी मंगळवार दि.१३ रोजी निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत लामखडे व व्हा.चेअरमन अमृता रसाळ यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचे शिष्टमंडळाने हंगा येथे जाऊन आमदार नीलेश लंके यांची भेट घेतली असून तशाप्रकारे निवेदन देण्यात आले आहे.**

खरीप हंगामी पिकांमध्ये प्रामुख्याने कांदा हे पिक येत असून कांदा पिकाला पाणी न मिळाल्यास हे पिक वाया जाईल व शेतकऱ्यांना फार मोठ्या प्रमाणात आर्थिक भार सोसावा लागेल या भागात किमान कोट्यवधीचा फटका शेतकऱ्यांना बसेल यासाठी आमदार नीलेश लंके हे सत्ताधारी पक्षाचे सर्वात प्रमुख आणि कार्यक्षम आमदार म्हणून त्यांचा राज्यात नावलौकिक आहे.



उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे वजन आहे यासाठी आमदार लंके यांनी सरकारकडे कुकडी डावा कालव्याला दि.२५ तारखेपर्यंत पाणी सोडण्याची मागणी करावी शासनातील पाटबंधारे विभागाचे अधिकारी या मागणीची नक्की दखल घेतील व पाणी सोडतील अशी अपेक्षा शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने व्यक्त केली आहे. आमदार लंके यांनी याबाबत संबंधीत मंत्री महोदय तसेच पाटबंधारे विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांना भेटून ही मागणी मंजूर करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही दिली.

फलोद्यान सहकारी संस्थेचे माजी चेअरमन रामदास वरखडे, शिवशक्ती पाणी वापर संस्थेचे चेअरमन खंडू लामखडे, प्रगतीशील शेतकरी बबन वरखडे, बाळा बाबुराव लामखडे, शिवाजी डेरे, यशवंत येवले आदी उपस्थित होते.आमदार लंके यांना दिलेल्या निवेदनावर शेकडो शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.

# डोळयांच्या सुरक्षेबाबात निष्काळजीपणा नको

## डॉ. ज्ञानेश्वर लंके यांचा सल्ला

पारनेर : प्रतिनिधी

**डोळे ही आपणास निसर्गाकडून मिळालेली मोफत देणगी असून डोळयांच्या सुरक्षिततेबाबत निष्काळजीपणा बाळगू नका असा सल्ला डॉ. ज्ञानेश्वर लंके यांनी दिला.**

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या अभियानांतर्गत पारनेर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स येथे बदलत्या जीवनशैलीमुळे मुलांमध्ये वाढत जाणारे डोळयांचे विकार या विषयावर डॉ. ज्ञानेश्वर लंके यांच्या उपस्थितीत मार्गदर्शन करणारा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी डॉ. लंके यांनी डोळयांच्या काळजीबाबात विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. शिक्षण संस्थेचे संचालक गिताराम म्हस्के या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. लंके म्हणाले, मोबाईल जवळून पाहणे, जवळून टीव्ही पाहणे, आहारात कमी प्रमाणात पालेभाज्या असणे या बाबी डोळयांचे विकास वाढण्यास कारणीभुत ठरतात. त्यावर उपाय म्हणून दररोज मैदानी खेळ खेळावेत, उन्हात असताना चष्मा वापरावा, आहारामध्ये पालेभाज्या, गाजर यांचा समावेश करावा, डोळे, हात, पाय नियमितपणे स्वच्छ धुवावेत. डोळयांना त्रास जाणवत असेल तर तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून घ्यावी असा सल्ला डॉ. लंके यांनी दिला.



पारनेर पब्लिक स्कुल येथे बदलत्या जीवनशैलीमुळे मुलांमध्ये वाढत जाणारे डोळयांचे विकार या विषयावर मार्गदर्शन करणारा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा संस्थेचे संस्थापक, प्राचार्य गिताराम म्हस्के यांनी सांगितले की बदलत्या आहारशैली तसेच जीवनशैलीमुळे लहान मुलांमध्येही डोळयांचे विकार जाणवत असून ते टाळण्यासाठी आहारात बदल करणे आवष्यक आहे. विद्यार्थ्यांनी डोळे स्वच्छ धुण्याचे आवाहन करतानाच डोळयांच्या संरक्षणाची काळजी घेण्याबाबत त्यांनी सुचित केले.

या कार्यक्रमास संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के, सचिन मोढवे, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन तसेच आभार प्रदर्शन दिपक जाधव यांनी केले.

# संघर्षमय व्यक्तीमत्वाचा सुवर्णमहोत्सवी वाढदिवस!

## चंद्रकांत चेडे यांनी दिला आठवणींना उजाळा



**अशिक्षीत आई वडील असूनही शिक्षणाचे महत्व ओळखून शास्त्र शाखेचे पदवीधर असलेले पारनेर शहराचे माजी उपनगराध्यक्ष तसेच किसान परिवाराचे सर्वेसर्वा, यशस्वी उद्योजक चंद्रकांत चेडे यांचा गुरूवार दि. १५ फेब्रुवारी रोजी ५० वा वाढदिवस. सुवर्णमहोत्सवी वाढदिवसानिमित्त त्यांनी दिलेला हा जुन्या आठवणींना उजाळा**

गुरूवारी सुवर्णमहोत्सवी वाढदिवस साजरा करताना गुरूजन, मित्र, नातेवाईक, लहान थोर माता भगिनी, गेल्या ५० वर्षांच्या वाटचालीत साथ देणाऱ्या हितचिंतकांचे सर्वप्रथम मी आभार माणतो. दरवर्षी १५ फेब्रुवारी रोजी वाढदिवसानिमित्त सर्वजण आवर्जुन शुभेच्छा देतात. या शुभेच्छांमधून पुढील वाटचालीसाठी उर्जा मिळते. त्याच शुभेच्छांमधून तुमच्या सर्वांच्या प्रेम भावनांचीही जाणीव होते.

१५ फेब्रुवारी १९७४ मध्ये जन्मलेले चंद्रकांत चेडे सांगतात, आई वडील अशिक्षित असूनही त्यांनी मला चांगले शिक्षण दिले. दोन बहिणी आणि मी असे तिघे बहिण-भावंडे. बहिनींनीही उच्च शिक्षण घेत आई वडीलांनी टाकलेला विश्वास सार्थ ठरविला.

शिक्षण पुर्ण झाल्यानंतर बंधू वसंतराव यांच्या मदतीने व्यवसायात पदार्पण केले. व्यवसायात स्थिर स्थावरल्यानंतर समाजकारण तसेच लोकसेवेची आवड असल्याने सन २००९ मध्ये किसान युनियन पतसंस्थेची स्थापना केली. ग्रामीण भागातील तरूण वर्ग व्यवसायात आला पहिजे या भावनेतून अनेक तरूण, होतकरून व्यवसायीकांना कर्ज रूपाने मदत केली. पुढे किसान दुध शितकरा केंद्र व उपपदार्थ निर्मितीममध्ये पदार्पण केले. या व्यवसायाच्या माध्यमातून परिसरातील शेकडो शेतकरी बांधवांना गाईचे वाटप करण्यात आले.

### पवार, ठाकरे यांच्या भेटी

देशाचे नेते शरदचंद्र पवार यांनी पारनेर दौऱ्याप्रसंगी दिलेली चेडे यांच्या निवासस्थानी भेट तसेच शिवसेना प्रक्षप्रमुख उध्दव बाळासाहेब ठाकरे यांनी किसान शिक्षण संकुलास दिलेली भेट हे आपल्या जीवनातील अविस्मरणीय क्षण असल्याच्या भावना चेडे यांनी व्यक्त केल्या.

### हजारे, व्दिवेदी यांच्याकडून गौरव

आपल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन भास्कर वृत्तसमुहाने ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे तसेच तत्कालीन जिल्हाधिकारी राहुल व्दिवेदी यांच्या हस्ते चेडे यांचा गौरव करण्यात आला. ज्येष्ठ पत्रकार संजय वाघमारे यांनी आपल्या कामाचा अहवाल भास्कर वृत्त समुहास सादर केल्याचेही चेडे यांनी आवर्जुन नमुद केले.

### सामाजिक बांधिलकी

पारनेर शहरात अनेक उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जोपासली. दुष्काळामध्ये जनावरांसाठी चारा छावणी सुरू केली. पाण्याच्या टाक्यांचे वितरण करण्यात आले. दुधाला योग्य दर मिळावा यासाठी आंदोलन करण्यात आले. दुष्काळामध्ये पारनेर शहराला स्वच्छ पाणी मिळावे यासाठी उपोषणाचे अश्र उगारण्यात आले. गरजू नागरीकांना मोफत कपडे, आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आल्याचे चेडे म्हणाले.

### तिघांना उपनगराध्यक्ष पदाची संधी

दोन वर्षांपूर्वी पार पडलेल्या नगरपंचायतीच्या निवडणूकीत शहर विकास आघाडीची स्थापना केली. या आघाडीला निवडणूकीत चांगले यश मिळाले. आघाडीस ३ हजार मते मिळून अशोक चेडे, सुरेखा भालेकर, भुषण शेलार हे उमेदवार विजयी झाले. आघाडीच्या सुरेखा भालेकर यांना उपनगराध्यक्षपदाची संधी मिळाली. स्वतःच्या हिमतीवर पारनेर नगरपंचायतीचे तीन उपनगराध्यक्ष करू शकलो याचाही चेडे यांना आनंद आहे.

### कृतज्ञता

राजकीय, सामाजिक, व्यवसायीक जीवनात काम करताना मित्रवर्य कुणाल पोटे, गुरूवर्ग सुधाकर जाधव यांनी भक्कम साथ दिली. मित्र रामदास वाळुंज यांनी अनेक प्रेमाचे शब्द दिले त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतानाच व्यवसायीक जीवनात आधार देणारे, आहोरात्र विश्वासाने उभे रहिलेले बंधू लक्ष्मण चेडे, तान्हाजी सालके, नीशा भोर, शिला सालके, विष्णू भिसे यांच्यासह अरूण, रमेश, राजू, अमोल हे मनापासून साथ देत असल्याबददल चेडे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. यापुढील आयुष्यातही अशीच साथ द्या अशी सादही चेडे यांनी घातली आहे.

### भरीव विकास कामे

नगरपंचायतीचा कारभार करताना शहरात भरीव कामे केली. रस्त्यांबरोबरच ३ हजार एलईडी पथदिवे तसेच २५० दिव्यांचे पोल बसविण्यात आले. स्वतंत्र मटण मार्केट तसेच बाजार पेठेमध्ये भाजी मार्केटची निर्मिती केली. शहराच्या पाणी योजनेचा प्रस्ताव तयार करण्यात आला. आम्ही सत्तेत असतानाच पाणी योजनेचे सर्वेक्षणही झाले याचा आनंद असल्याचे चेडे यांनी सांगितले.

### फटाक्यांच्या व्यापारापासून श्री गणेशा

शास्त्र शाखेची पदवी घेतल्यानंतर बंधू वसंतराव व अशोकराव यांच्या प्रेरणेतून सन १९९५ मध्ये व्यवसायात पदार्पण केले. वसंतरावांच्या किराणा दुकानासमोर फटाक्यांचे दुकान थाटून व्यापाराचा श्रीगणेशा केला. फटाक्याच्या हंगामी व्यवयायात यश संपादन केल्यानंतर वसंतराव यांनी पशुखाद्याचे दुकान सुरू करून दिले. या व्यवसायात स्थिरावत असतानाच हॉटेल व्यवसायात पदार्पण केल्याचे चेडे यांनी सांगितले.

### कुटूंबाची साथ आणि उच्चशिक्षित मुले

व्यवसाय, पतसंस्था, शिक्षण संस्था, समाजकारण, राजकारण करीत असताना आई, वडील, पत्नी यांची मोलाची साथ लाभली. याचा अभिमान आहे. सर्व करीत असताना पत्नीच्या मदतीने कुटूंबाकडे लक्ष दिले. त्यामुळेच मुलगा ऋषीकेश इंजिनिअर झाला तर मुलगी डॉ.तृप्ती ही एमबीबीएसचे शिक्षण घेते आहे. भाचे तुषार तुकाराम औटी हे इंजिनिअर, दुसरे भाचे डॉ. तेजस तुकाराम औटी एमबीबीएस, डॉ. अनुज शिवाजी औटी बीएएमएस, भाची हर्षदा शिवाजी औटी इंजिनिअर तर भाचे जावाई अतिष वाळुंज हे मुख्याधिकारी या राजपत्रीत अधिकारी पदावर आहेत. हे आपल्या मार्गदर्शनामुळे शक्य झाले याचा चंद्रकांत चेडे यांना अभिमान व आनंद आहे.

### राजकारणात पाऊल

सन २०११ मध्ये राजकीय जीवनात पदार्पण केले. सुरूवातीस ग्रामपंचायत सदस्य पदाच्या निवडणूकीत यश संपादन केले. नगरपंचायतीच्या स्थापनेनंतर नगरसेवकाची निवडणूकही जिंकली. श्रेष्ठी विश्वासात घेत नाही हे लक्षात आल्यानंतर श्रेष्ठींपासून दुर होत नव्या गटाची स्थापना करीत नगरपंचायतीमध्ये सत्तांतर घडवून आणले. वर्षा शंकर नगरे यांना नगराध्यक्षपदी विराजमान होण्यासाठी मदत केली. उपगराध्यक्षपदाची संधी स्वतः घेतली. आपल्या सहकाऱ्यांना संधी मिळावी या हेतूने उपनगराध्यक्षपदाचा राजीनामा देउन दत्ताशेठ कुलट यांना उपनगराध्यक्षपदाची संधी दिल्याचे चेडे म्हणाले.

### भालेकर, वाघमारे यांना संधी

अर्जुन भालेकर यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा उपाध्यक्षपदाची संधी तसेच पत्रकार विजय वाघमारे यांना स्विकृत नगरसेवकपदाची संधी दिल्याचे चंद्रकांत चेडे यांनी आवर्जुन सांगितले.

### शिक्षण क्षेत्रात दमदार कामगिरी

विविध क्षेत्रात यशाची पायरी चढत असताना सन २०१५ मध्ये किसान बहुउददेशिय संस्थेची स्थापना केली. या परिसरात सीबीएसई अभ्यासक्रमाचे विद्यालय नसल्याने बुध्दीमंतांची खाण म्हणून ओळख असलेल्या पारनेर तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी सीबीएसई अभ्यासक्रम असलेले तालुक्यातील पहिले इंटरनॅशनल स्कुल सुरू केले. पुढे २०२१ मध्ये किसान आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेजची स्थापना करून विविध शाखांचे दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून दिले. सन २०२२ मध्ये तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी लॉ कॉलेजला मान्यता मिळवून विधी शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली.आज रोजी या शिक्षण संस्थेमध्ये १ हजार ८०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत हही माइ-यासाठी मोठी अभिमानाची बाब असल्याचे चेडे आवर्जुन सांगतात. अनेक विद्यार्थी डॉक्टर, इंजिनिअर होत आहेत, संस्थेची शैक्षणिक उंची झपाटयाने वाढते आहे याचा मनस्वी आनंद असल्याचे ते म्हणाले.







सस्नेह निमंत्रण !

सन्मा.लोकनेते आमदार निलेशजी लंके साहेब

यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर खालील विविध विकास कामाचा

**भुमीपूजन सोहळा**



गुरुवार दि.१५/०२/२०२४ रोजी सायंकाळी.५.३० ते ७.०० वाजता

शुभहस्ते

मा.आ.डॉ.श्री.निलेशजी लंके

पारनेर नगर विधानसभा मतदारसंघ

प्रमुख उपस्थिती -

सभापती/उपसभापती व संचालक मंडळ कृषी उत्पन्न बाजार समिती पारनेर
नगराध्यक्ष/उपनगराध्यक्ष/नगरसेवक पारनेर नगरपंचायत पारनेर
राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष/निलेश लंके प्रतिष्ठाण सर्व आजी/माजी पदाधिकारी
पारनेर नगर विधनासभा मतदारसंघ
सरपंच/उपसरपंच/ग्रामपंचायत सदस्य व चेअरमन/व्हा.चेअरमन/संचालक मंडळ
ढवळपुरी जिल्हा परिषद गट

| अ.क्र | कामाचे नाव | रक्कम(लक्ष) |
|---|---|---|
| १) | मौजे भाळवणी येथे भाळवणी ते खारे कर्जुने रस्ता सुधारणा करणे | ९००.०० |
| २) | मौजे.भाळवणी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सभागृह बांधणे | २५.०० |
| ३) | मौजे.भाळवणी येथे नागेश्वर देवस्थान परिसर बहुउद्देशीय हॉल बांधणे | ७५.०० |
| ४) | मौजे.भाळवणी येथे मळगंगा मंदिर रस्ता ते पांदड वस्ती रस्ता करणे | २४.०० |
| ५) | मौजे.भाळवणी येथे जामगांव रस्ता ते शृंगऋषी गड रस्ता करणे | २४.०० |
| ६) | मौजे.भाळवणी येथे नागबेंद वाडी रस्ता ते कपाळे वस्ती रस्ता करणे | २४.०० |
| ७) | मौजे.भांडगाव येथे भांडगाव ते दैठणे गुंजाळ(भुजबळ वस्ती) रस्ता इजीमा-२६८ रस्ता सुधारणा करणे | ७५.०० |
| ८) | मौजे. भांडगाव येथे पिंपळाचा मळा रस्ता सुधारणा करणे | २०.०० |
| ९) | मौजे.भांडगाव येथे भैरवनाथ मंदिरासमोर सभामंडप बांधणे | १५.०० |
| १०) | मौजे.भांडगाव येथे हनुमान मंदिरासमोर सभामंडप बांधणे | १५.०० |
| ११) | मौजे.सारोळा आडवाई येथे कोल्हापुरी बंधारा बांधणे | ६०.०० |
| १२) | मौजे.माळकूप येथे नगर कल्याण हायवे ते स्वामी समर्थ मंदिर रस्ता सुधारणा करणे | ३०.०० |

कार्यक्रमाचे स्थळ:-सारोळा आडवाई, भांडगाव, माळकूप व भाळवणी
ता. पारनेर, जि.अहमदनगर

आपले नम्र:-समस्त ग्रामस्थ सारोळा आडवाई, भांडगाव,माळकूप व भाळवणी


'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com